# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांक:- १६/०२/२०१९

## *असरअलीच्या संघाने जिंकला बिरसा मुंडा व्हॉलीबॉल चषक*

पोलीस कवायत मैदान गडचिरोली येथे दिनांक १५/०२/२०१९ रोजी जिल्हास्तरीय बिरसा मुंडा व्हॉलीबॉल चषक स्पर्धा आयोजीत करण्यात आली होती. सदर चषक त्रिवेणी व्हॉलीबॉल संघ, असरअली उपविभाग सिरोंचा यांनी पटकावला. त्रिवेणी व्हॉलीबॉल संघ असरअली (उपविभाग सिरोंचा) आणि आर. डी. कॉलेज व्हॉलीबॉल संघ आलापल्ली (उपविभाग अहेरी) यांच्यात झालेला अंतिम सामना अत्यंत चुरशीने खेळला गेला. तब्बल १ तास १० मि. रंगलेल्या या सामन्यात पहिल्या सेट मध्ये आलापल्ली संघाने २५-१९ गुणांची आघाडी मिळवली. दुसऱ्या सेट मध्ये जोरदार पुनरागमन करून असरअली संघाने आलापल्ली संघावर २५-२१ या अंतराने गुण मिळवत आपले आव्हान कायम ठेवले. तिसऱ्या व निर्णायक १५ गुणांच्या सेटमध्ये मात्र असरअली संघाने आलापल्ली संघावर १५-१३ गुण मिळवून बिरसा मुंडा चषकावर आपले नाव कोरले. या स्पर्धेत आलापल्ली संघ उपविजेता ठरला. तिसऱ्या स्थानासाठी जिल्हा क्रिडा व्हॉलीबॉल प्रशिक्षण संघ, गडचिरोली (उपविभाग गडचिरोली) आणि मोडस्के व्हॉलीबॉल संघ, गट्टा (जां) (उपविभाग हेडरी) या दोन संघामध्ये लढत होऊन उपविभाग गडचिरोली संघाने बाजी मारली.

अजिंक्य ठरलेल्या असरअली संघास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक रूपये २५,०००/- रोख आणि बिरसा मुंडा चषक व प्रमाणपत्र मा. श्री. अंकुश शिंदे (भा.पो.से.) पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. उपविजेत्या संघास रूपये २०,०००/- रोख, चषक व प्रमाणपत्र मा.श्री. शैलेश बलकवडे (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक गडचिरोली यांच्या हस्ते देण्यात आले तर गडचिरोली उपविभागास तृतीय क्रमांक १५०००/- रोख, चषक व प्रमाणपत्र मा. श्री. महेंद्र पंडीत अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन), मा. डॉ. हरी बालाजी अपर पोलीस अधीक्षक (अभियान), मा. डॉ. मोहित कुमार गर्ग अपर पोलीस अधीक्षक (नक्षल)

यांच्या हस्ते देण्यात आले. कार्यक्रमास मोठया संख्येने पोलीस अधिकारी, पोलीस कर्मचारी व नागरिक उपस्थीत होते.

३० डिसेंबर २०१८ पासून खेळल्या गेलेल्या व अत्यंत यशस्वी ठरलेल्या या स्पर्धेत तब्बल ७६४ संघानी तसेच एकूण ९१६८ खेळाडूंनी भाग घेतला होता. संपुर्ण स्पर्धा अतिशय चुरशीने खेळली गेली दुर्गम व अतिदुर्गम भागातील तरुणांच्या कलागुणांना वाव मिळावा व गडचिरोलीमधुन भविष्यात मोठे खेळाडु निर्माण व्हावे यासाठी मा. श्री. शैलेश बलकवडे पोलीस अधीक्षक सा़ो. गडचिरोली यांच्या संकल्पनेतून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

